गणितज्ज्ञ जयंत नारळीकर

# आई-वडील दोघांकडून जाणीवपूर्वक प्रयत्न

आईकडून आणि वडिलांकडून उच्च शिक्षणाची परंपरा लाभलेल्या घरात मी जन्म घेतला. लहापण सारे बनारसमध्ये गेले. मातृभाषा जरी मराठी असली तरी घराबाहेर, शाळेत, गडीमाणसांशी सर्वत्र हिंदीतून बोलणे. अशा परिस्थितीत मराठी भाषेचे संस्कार माझ्यावर आईकडून झाले. रोज रात्री झोपताना आई तुकारामांचे अभंग म्हणत असे. ते कानावर पडत. घरात मराठी भाषेत मुलांसाठीची अनेक गोष्टीची पुस्तके होती. विशेषतः केशव भिकाजी ढवळ्यांची पुस्तके फार लोकप्रिय होती. अशी अनेक पुस्तके सुरवातीला आईने वाचून दाखविल्यानंतर मग हळूहळू मला वाचनाची गोडी लागली. ही गोडी लावण्याचे श्रेय अर्थातच आईला.

१९३० मध्ये स्त्री वर्गात शिक्षणाचा फारसा प्रचार झालेला नव्हता. त्या काळात माझी आई संस्कृत घेऊन एम. ए. झाली. माझ्या वडिलांचे वडीलही संस्कृतचे शास्त्री होते. लहानपणी आईने किती तरी संस्कृत श्लोक, स्तोत्रे, माझ्याकडून पाठ करून घेतली. एक श्लोक पाठ केला की एक रुपया अशी बक्षिसाची लालूच पण होती. सुरवातीला बक्षिसाच्या आशेने आणि नंतर आवड म्हणून मी लहानपणी खूप पाठांतर केले. लहानपणी पाठ केलेली भगवद्‌गीता आजही निम्मीअर्धी मुखोद्गत आहे. आईच्यामुळे मला संस्कृत साहित्याची गोडी लागली आणि त्याचा मला खूप फायदा झाला.



डॉ. जयंत नारळीकर

पुस्तके वाचणे आणि पाठांतर या बरोबरच खेळ खेळण्यासाठी मला प्रोत्साहन मिळत गेले. विद्यापीठाच्या आवारातील आमची घरे खूप मोठी. घराच्या आसपास खेळायला ऐसपैस जागा. त्यामुळे क्रिकेट आणि बॅडमिंटन या सारख्या विलायती खेळांबरोबरच कुस्ती आणि मुष्टियुद्ध यासारखे देशी खेळ मी खूप खेळलो.

माझे वडील बनारस हिंदू विद्यापीठात गणिताचे प्राध्यापक होते, पण मीही गणितात पारंगत व्हावे हा विचार किंवा तशी महत्त्वाकांक्षा त्यांनी माझ्यावर लादली नाही. किंबहुना मी तिसरीत असेपर्यंत माझे वडील कोण आहेत हे मला माहित नव्हते. माझ्या एका शिक्षकाकडून ही मला माहिती समजली आणि मग मात्र मला आनंद झाला. कारण मलाही गणित विषयाची आवड होतीच. या विषयातील वडिलांच्या पूर्वज्ञानाचा लाभ मला अर्थातच झाला. शालेय अभ्यासक्रमात नसलेली गणिताची पुस्तके त्यांनी मला आणून दिली. माझे मामा वसंतराव आणि मोरेश्वर हुझुरबझार गणित विषयातील तज्ञ. ते मला गणितातील कूटप्रश्न Challenge Problems सोडवायला देत. ते शालेय अभ्यासक्रमाच्या बरेच पुढचे असायचे. या साऱ्याचाच मला फायदा झाला.

वडिलांच्या ओळखी खूप. त्यामुळे लहान वयात फार मोठी माणसे आमच्या घरी येऊन गेली. रँग्लर परांजपे यांनी माझ्याकडून वर्तमानपत्रातील इंग्रजी परिच्छेद वाचून घेतला व इंग्रजी शब्दांवरचे आघात कुठे चुकतात हे दाखवून दिले. याचे महत्त्व पुढे मी विलायतेत गेलो त्यावेळी पटले. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, सी. डी. देशमुख यांना मी संस्कृतचे श्लोक म्हणून दाखवून त्यांच्याकडून प्रशस्ती मिळवली. या साऱ्यातून प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष अनेक प्रकारे मला फायदा मिळत गेला.

वडिलांनी कधी माझ्याजवळ बसून अभ्यास करून घेतल्याचे आठवत नाही, पण पहाटे उठून रोज दोन तास अभ्यास झाला पाहिजे हा त्यांनी नियम घालून दिला. सुरवातीला इतक्या पहाटे झोपेतून उठायचे म्हणजे कटकट वाटायची, पण पुढेपुढे त्याची सवय झाली व पहाटेचीच वेळ अभ्यासाला योग्य कशी हेही पटले. मोठा झाल्यावरसुद्धा मध्यरात्रीपर्यंत जागून अभ्यास कधी केला नाही आणि पहाटे उठण्याचा नियमही मोडला नाही.

माझी आई संस्कृत घेऊन एम. ए. झाली होती पण पीएच.डी. करायची म्हणजे खूप वेळ लागणार. थोडेसे घराकडे दुर्लक्ष होणार हे सर्व लक्षात घेऊन आईने पी.एच.डी.च्या मागे न लागता आम्हा मुलांसाठी अधिक वेळ देणे पसंत केले. आईने त्यावेळी हा जो जाणीवपूर्वक निर्णय घेतला तो माझ्या मनावर खोल ठसा उमटवून गेला.

माझ्या आई-वडिलांचे काही स्वभावविशेष



प्रा. वि. वा. नारळीकर व सौ. सुमती नारळीकर

माझ्यात काही प्रमाणात आले असावेत. आजचे काम उद्यावर ढकलायचे नाही, ते वेळच्यावेळी उरकून टाकायचे ही माझ्या वडिलांची सवय. एखादे काम मला ठराविक मुदतीत पूर्ण करावयाचे असेल तर ते मी शक्य तो मुदतीपूर्वीच पूर्ण करून टाकतो.

टापटीप आणि नीटनेटकेपणा यांची आईला आवड. घरातल्या वस्तूंची मांडणी करण्यामागेसुद्धा काही योजना होती. कोणती वस्तू किती वेळा लागते, कोणती कमी उपयोगाची, कोणती जास्त उपयोगाची हे लक्षात घेऊन वस्तू, चटकन मिळण्यासाठी कुठे ठेवायची हे सारे विचारपूर्वक ठरविलेले. गरजेप्रमाणे स्वतःची स्वतः एखादी गोष्ट शोधून काढणे हे आईचे आणखी एक वैशिष्ट्य. त्या काळात थर्मास नव्हते, पण आईने अन्न गरम राहण्यासाठी साधा घरगुती उपाय शोधून काढला.

आजही मला आई-वडिलांचा सहवास मिळतो आहे आणि आम्ही मोठे झाल्याचे त्यांना पाहायला मिळते आहे, ही भाग्याची गोष्ट म्हणावी लागेल.